म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. २९०

य-निधीकरितां

मुद्दाम लिहिलेलें

# नव भिक्षुगीत



निर्मी श्रीकालिकेच्या पुरीं,
लिग' या संयुक्त एकोदरीं,
महाराष्ट्रस्थ होमरूलरी
कली मागणी जीहि गांधिलिखितें, ती या अम्हां सत्वरीं.

REFBK-0001469
REFBK-0001469

महाराष्ट्र-स्वराज्यसंघ-निधीकरितां

मुद्दाम लिहिलेलें

# नव भिक्षुगीत

राज्योत्कर्ष करावयास झटलां पूर्वीं जसे सर्वही,
आविप्रोत्तम अंत्यजावधि, सदा टाकूनि तो गर्वही-
जात्युत्पन्न; झटा तसेचि त्यजुनी त्या मत्सरातें पुन्हा;
नाहीं होत नृपाविरुद्ध तिळही यामाजि कांहीं गुन्हा। १

रचनाकार


## रा. ब. गोडबोले.


चंपाषष्ठी, शके १८३९

किंमत २ अ

REFBK-0001469
REFBK-0001469

ध्यातां शिव रामातें, रामाचें चित्त सक्त शिवनामीं,





शिवरामपद ध्यातां पटकावें मुक्तिचें स्वपद नामीं ॥

शिवस्य हृदयं रामे रामस्य हृदयं शिवे । शिवरामपदद्ध्याता शिवरामपदं व्रजेत् ॥

# प्रस्तावना.

प्रिय बंधुभगिनींनो, आपल्या देशांत राज्यकर्त्यां प्रभूंजवळ स्वराज्याची मागणी करण्याची जी मोठी चळवळ माजली आहे, व ती मागणी सफळ होण्याबद्दल लोकमान्य नागरिकांपासून तों अगदीं अशिक्षित नांगऱ्यापर्यंत सर्वांस जी तळमळ लागून राहिली आहे, त्या चळवळींत सामर्थ्यांनुसार आपणहि कांहीं काम करावें अशी स्फूर्ति मनास होऊन माझ्या हातून ही पुढील पद्यावलि जन्मास आली.

परब्रह्माप्रमाणें हिला आद्यंत नव्हते, व मायास्वरूपाप्रमाणें तिला नामरूपहि नव्हतें. तेव्हां बारशाचे दिवशीं या बालिकेचें नांव काय ठेवावें अशी पंचाईत पडली; इतक्यांत कल्पना सुचली कीं, आपलें सर्व राष्ट्र स्वराज्याची भिक्षा मागणारें भिक्षु बनलें आहे. तेव्हां आपणहि या भिक्षुसंघाला मिळून त्याच्या प्रार्थनेची री ओढावी. सुदैवानें ही भिक्षा पदरीं पडली तर आपल्या देशांत जें फार मोठें (महत्तम) हिंदी राष्ट्र जन्मास यावयाचें आहे, त्याचे पूर्वींचें महत्तररूप त्यानें आपणांस कसें प्राप्त करून घ्यावें, याची या महद्राष्ट्रांतील (महाराष्ट्रांतील) तरुण पिढीस ओळख करून द्यावी असें मनांत योजिलें.

स्वराज्य ही कांहीं आम्हांस नवीन चीज नाहीं. वेदकाला-

पासून किंवा रामायणभारतकालापासून किंवा त्याचे अली-कडील ऐतिहासिक कालांतहि आम्हांस त्याची ओळख असून आम्ही स्वराज्याचा उपभोग घेऊन स्वराज्य चांगल्या प्रकारें चालविलें आहे. ही गोष्ट राज्यकर्त्यांस विदित असूनहि त्यांच्यांतील कांहीं धेंडें मुद्दाम वेड पांघरून आम्हांस स्वराज्याला अपात्र ठरवूं पहात आहेत. त्यांसहि उत्तर द्यावें, व चालू काळाप्रमाणें स्वराज्य चालविण्यास आपली पूर्व पद्धति न सोडतां शिक्षणक्रमांत व समाजस्थितींत काय फरक केला पाहिजे याचेंहि दिग्दर्शन करावें, म्हणून हा प्रयत्न केला आहे.

शेवटीं इतकेंच सांगावयाचें कीं—

**विचारकंथावृत भिक्षु येतो,**
**गीतें तुम्हां गाऊन दाखवी तो;**
**विचार याचा बरवा करावा,**
**परी विकारास न वाव द्यावा. १**

यशवंतविद्याभक्ताश्रम
२३० शनवार, पुणें
चंपाषष्ठी शके १८३९

आपला नम्र सेवक,
नव भिक्षु **रा. ब. गोडबोले.**

### महाराष्ट्र-स्वराज्यसंघ-निधीकरितां मुद्दाम लिहिलेलें

# नव भिक्षुगीत

श्रीशंकरां नास्तिकसंघजेत्यां
या भारतीं सद्गुरु विप्र जे, त्यां
वंदूनि माझ्या जननीस, ताता,
मी आजि[1] गातों नवाभिक्षुगीता. १

श्रीरामें प्रतिपाळिली नयविदें जें भारती हे धरा,
श्रीकृष्णें उपदेशिली प्रियतमा गीता यदा त्या नरा[2],
त्या कालींच खरें स्वराज्यहि तसें सौराज्य देशास या
झालें प्राप्त तसेंच सौख्यहि जना; शंका न येथें सख्या[3] ! २

महद्राष्ट्रीं[4] पाया शिवनृपकरें ज्यास पडला,
मला तत्साह्यातें अवसरहि 'सां'पूर्व पडला[5]-
भला सुक्षेत्रीं[6] या; गुरुगण रचायास सजला-
स्वराज्याच्या भव्या तदुपरि[7] नवा थोर मजला. ३
पसरुनि वसा चारी देशीं; महत्तर व्हा; वहा-
सतत महती चिंता, व्हाया महत्तम; वाहवा-

---

१ का. शु. १३ शके १८३९; सोमवार ता. २६।११।१७. २ अर्जुनाला. ३ मित्रा. ४ महाराष्ट्र देशांत. ५ 'सां' पूर्व पडला =सांपडला. ६ या ब्राह्मणशरीरांत (कवीच्या), अथवा पंढरपूर-क्षेत्रीं. ७ त्या पायावर.

मिळवुनि, मराठयांच्या नांवा सुशोभित हो करा.
विनवित असें 'द्यावें देवें यश तुमच्या करा.' ४

कथुनी कवि तोटक[1] वृत्त असें,
सुचवीत सुराज्य सुरेख कसें:
तदुपार्जनयत्न झटूनि करा,
विनवीत तुम्हांस जुळोनि करा. ५

संवदध्वमिति सांगते श्रुती,
तोचि अर्थ मननांत आणिती–
लोकनायक सुराज्यसाधनीं;
साह्य त्यांप्रति करा मनीं धनीं. ६

'बा! ऐहिकाला न कधीं भुलावें,
स्वर्गीय राज्या अपुलें करावें'
खिस्तें असा जो उपदेश केला,
त्या टाकितां आज युरोप मेला! ७

'विसाविया या, शतकांत ईश–
मेला' असें बोलती जे गवीश[2],
न लाजती ते जरि बोलतांना,
फळें तयाचीं दिसती जनांना. ८

असो, तयाचें अपणांस काय!
त्याचीं फळें भोगिति गौरकाय.
आम्हां जनां चाड बहूत वाटे
गुरूक्तिची; हेंच सुदैव मोठें. ९

"न केवलं यो महतोऽपभाषते
श्रृणोति तस्मादपि यः स पापभाक्"

---

१ अल्प; पक्षीं वृत्ताचें नांव. २ गोपति=वाचस्पति=शहाणे (दीड)

ही कालिदासोक्ति मनांत येती,
वाटे तिनें या हृदयास भीती. १०
न घेतां मनीं सद्गुरूचा निरोप,
पहा नाश पावे कसा तो युरोप;
तरी आपुलें राष्ट्र व्हाया निकोप,
खणा दुर्गुणांचें तयांतील रोप. ११
राष्ट्रांत या सद्गुरु विप्र साचे,
ध्यानीं धरा बोल सदा तयांचे;
वागा तसे, साधिल तें हितातें,
कल्याण देईल [1]सुतांसुतांतें. १२
जरी पाहिजे या जगीं थोर मान,
तरी माजलें जें जनीं मद्यपान,
खणा त्यास आधीं करोनी प्रयत्ना
जरी वांछितां त्या स्वराज्याख्य रत्ना. १३
झाले बहू जे गुरु या जनांत,
त्यांचें न होईल कधीं गणीत;
आपापल्या बा, गुरुंना भजावें,
परी सहिष्णुत्व [2]परीं धरावें. १४
ही आमुची रीत जुनी मनांत-
बा, वागवीं तूं फिरतां जनांत;
कल्याण तेणेंचि जगांत होय,
चित्तांत दे या वचनास सोय. १५
इस्त्रा[3]एल पहा कसे भटकती सर्वत्र बा हे मही,
नाहीं देश तयांस आज अपुला ऐसा म्हणायासही!

---

१ मुला-मुलींना. २ परधर्मातील गुरुंवर. ३ ज्यू लोक.

देवाचे बहु लाडके म्हणुनिया या भारतीं राहतों,
वर्षें फार सहस्र सोसुनि छळा, त्याचीं फळें पावतों १६

इस्रायलां त्यापरि पारशांना,
तैसें फिरंग्यांसहि इंग्लिशांना,
त्या आरबां त्यापरि मोंगलांतें,
राहावयाला दिधलें स्थलातें, १७

श्रुतींत ज्या वर्णित चार जाती,
धंद्यांमुळें त्या बहु भासताती;
वैदेशिकांच्या पडल्या भरीनें
त्या वाढल्यां देवाचि एक जाणे! १८

‘ हिंदी ’ अशा त्या सगळ्यांस देती–
नांवा नव्या; ही जगतांत रीती.
पाहोनि वाटे मज थोर कौतुक,
दिसे न त्यातें मज एकही तुक. १९

आम्ही हिंदी, आमुचा देश हिंदी,
भाषा नाहीं तेवढी मात्र हिंदी;
लागूं या कीं ती शिकायास; मंदी–
नाहीं बुद्धी, कायद्याचीहि बंदी. २०

“ ऐतिह्यातें[1] पढुनि अमुच्या जागृती हिंदि लोकीं–
होऊनी, ते हलवितील कीं सर्वथा ही त्रिलोकी.”
हें मेकाले वदुनि चुकला तेतिशीं आठ ऐकीं[2],
त्या भाकेतें सफळ बघण्या वांचलों, भाग्य हें कीं! २१

“संगच्छध्वं” श्रुति अशि असे बापुड्या काय ठावी–
त्या पाश्चात्या[3]? परि बुधजनीं ती तपासून घ्यावी.

---

१ इतिहासाला. २ इ. सन १८३३ मध्यें. ३ मेकॉलेला.

ब्रह्मक्षत्रद्विजगणिं, नव्हे अंत्यजांहींहि आज
सख्यत्वातें करुनि यवनीं, राखिली वेदलाज. २२
दादाभाई करुनि थकले यत्न पन्नास वर्षें,
ज्याच्या लाभा झटुनि खपले गोखलेही प्रहर्षें;
मेथा तैसे द्विजगणिं भले रानडे खर्च झाले,
त्या कार्यातें सफल बघण्या आज आम्ही भुकेले! २३
बोले झिन्ना[1] त्वरितचि पहा गोखल्याच्या व्रता, त्या
स्वीकारूनी मुसलमिनही होतसे विप्र जात्या;
झिन्ना व्हाया द्विजहि कृतिनें विप्रवर्गीं दिसोत,
तैसे त्यांच्या गुणविनिमयें आंग्ल सारे फसोत. २४

आज्ञा गुरूची परिपाळण्यांत
राज्यावरी हाणुनि एक लात,
श्रीराम गेला सहजीं वनास
सांगा मुलां हें करुनी प्रयास. २५

'शिवा जी म्हारां जा,' वचन सकळांच्या मुखिं असे,
तया मंत्रें वाटे शिवनृप जनांला कथितसे;
द्विजात्या वर्णांनीं करिं कर धरूनी निशिदिनीं,
स्वराज्याच्या लाभा बहुत झगडावें रिपुजनीं. २६

जी गांवपंचायतिची जुनी रीती,
स्वराज्यपायाच गमे मनास ती;
करा पुनर्जीवन त्या सुरीतिचें,
कीं बालकां शिक्षण तेंचि नीतिचें. २७
सुरक्षीत चालावया गांवगाडा[2],
भले शाहणे पंच शोधुनी काढा;

---

१ बॅरिस्टर जिना. २ गांवची व्यवस्था.

तयां लोकमान्यां जनीं आदरावें,
तयांनीं जनांच्या हितातें जपावें. २८
चालायाला गांवगाडा सुरेख
तेथें आधीं पाहिजे काय देख:-
शाळा आणी शाहणे पांच पंच,
यांचा तेथें पाहिजे एक संच. २९
जुन्या पूर्वजांच्या रिती आदराव्या,
बऱ्या वाटतां इंग्रजांच्याहि घ्याव्या;
स्वदेशीय वस्तू सदा वापराव्या,
मनानेंहि सेवूं नये ज्या पराव्या. ३०
शिकावें पराव्या[1] कराया स्वदेशी
कला जाणुनी घेउनी ज्या विदेशी;
स्वराज्यामधें त्या करायास देशी
नको खर्चही फारसा, हें पहाशी. ३१
न बोलतां शब्द कधीं मुखानें
नवे नवे काढुनि कारखाने,
टाटा कसे ते करिती श्रमांतें
हें पाहुनीयां करि उद्यमातें. ३२
अशी देवघेवी रुळे एकमेकीं,
तदा वाढते सर्व देशांत एकी;
मिटे बेकि; तेव्हां चढे देशकार्या-
बहू तेज; हें ठाउकें सर्व आर्यां. ३३
स्वराज्यस्थिती यावयातें अवश्य
अशा शिक्षणातें नसो पारवश्य[2];

१ परकीयांच्या. २ परस्वाधीनपणा.

म्हणोनीच तें देशभाषेंत द्यावें--
जनां, एवढें कार्य आधीं करावें. १४
‘ विकारां करी काम जो, तो त्यजावा ’
‘ प्रभातें मनीं राम चिंतीत जावा ’
अशा रामदासोक्तिला आदरावें,
तयें पात्र कल्याणमात्रासि व्हावें. १५
क्रिया एकटी एक हातीं धरावी,
फलप्राप्तिपर्यंत ती चालवावी;
मराठी चिकाटी स्वराज्या मिळाया,
जगा दावावा; ती न जाईल वाया ! १६
‘ विभक्त जे ते पडती क्षणांत,
संयुक्त जे ते टिकती जनांत;’
हा इंग्रजी मंत्र मनांत ठेवा,
असे सुखाचा जगिं तोच ठेवा. १७
सुविद्याप्रसारा झटावें द्विजांनीं,
करावें तयां साह्यही अंत्यजांनीं,
प्रकारें अशा वागतां एकमेकीं,
स्वराज्यार्थ ती कां न होईल एकी ? १८
जगीं निर्मिलें जातिभेदां विधीनें,
जनां प्राप्त ती होय त्यांच्या क्रियेनें;
म्हणोनी जनें जातिभेदा धरावें,
परी जातिच्या मत्सरातें त्यजावें. १९
मिळे जन्मकाळीं जया जाति जी ती–
धरीती शहाणे, कधीं न त्यजीती;
कधीं होउं देती तिची ना फजीती,

प्रयत्नें तिला उन्नतीतेंचि नेती. ४०
पुढारी खरे, जातिचे, दूरदर्शी,
म्हणोनी तयां नेमुनी कार्यदर्शी,
स्वराज्या मिळायास या सर्व देशीं,
झटावें त्वरें टाकुनी आळसाशी. ४१

ब्राह्मणेतर जनीं नवें दिसें, ब्राह्मणांस शिवलें न तें पिसें--
पूर्वकालिं, न शिवो पुढेंहि तें; साधतील न तयें जनीं हितें. ४२

राज्योत्कर्ष करावयास झटलां पूर्वी जसे सर्वही
आविप्रोत्तम[1] अंत्यजावधि[2], सदा टाकूनि तो गर्वही–
जात्युत्पन्न; झटा तसेचि त्यजुनी त्या मत्सरातें पुन्हां,
नाहीं होत नृपाविरुद्ध तिळही त्यामाजि कांहीं गुन्हा! ४३
विद्युद्वन्हि, समीर, सूर्य, अवघे द्याया सुखें मानवां--
दासांचेपरि राबती निशिदिनीं, हा खेळ वाटे नवा;
शास्त्रां अभ्यसुनी करा स्वकरगा नाना कला; वाढवा–
शेती, जी धनधान्यवस्त्रविषयीं आणील कीं वाढवा! ४४

कराया समृद्धी धनाची स्वदेशीं,
जयां लागतें जावयाला विदेशीं,
धरावें तयीं एक चित्तांत मर्म,
न सोडूं कधीं आपुलें धर्मकर्म. ४५

आत्मसंयम असे अवश्य या;
बाल्यकालिंच तया शिकावया–
लाविल्यास तरुणांस, तो जनीं
लाभ देइलाचि, हें धरा मनीं. ४६

क्रिया आपुली पालटावी अशेष[3],

---

१ उत्तम ब्राह्मणापासून. २ अंत्यजांपर्यंत. ३ सर्व.

विदेशांत जावें शिकाया विशेष;
कला तेथच्या सर्व आणून देशीं
जनां सांगुनी त्या कराव्या स्वदेशी. ४७
दांपत्य पाया दिसतें कुटुंबा,
पाया कुटुंबें असती समाजा
समाजपायावरी राष्ट्र नांदे,
राष्ट्रीं स्वराज्यांतचि सौख्य साधे. ४८
समाजसौख्यास हवें स्वराज्य,
जगांत जें साधितसे सुराज्य;
त्याकारणें यत्न करा अहर्निशीं,
होईल तें प्राप्त जरी न [1]या दिशीं. ४९
'पतीच दैवत्य असे सतीला'
हें थोरलें सत्य जिच्या मतीला
पटे, सुकन्या जगिं तीच धन्या;
अन्या गणाव्या सकला अधन्या. ५०
वधू [2]वरीतो मजकारणें पिता,
दे मान त्यातेंहि मदीय माता;
पत्नी म्हणूनी मज मान्य हे असे,
हें मानिती ते न सुपुत्र बा कसे? ५१
वधू वीरपत्नी, पुढें जन्म देतां–
सुपुत्रास, ती होतसे वीरमाता;
सतीत्वें समाजास [3]भूषाचि फार,
स्वराष्ट्रावरी लादिते ऊपकार. ५२
पूर्वीं स्वराज्यांत अशा प्रकारीं

---

१ आज, तावडतोब. २ पसंत करितो. ३ अलंकार.

जे जन्मले वीर खरे शिकारी,
स्वारी-शिकारी करण्यांत धीट
ते दाविती शत्रुस नैव पाठ. ५३
पतिहिता जपताति पतिव्रता
न गणितां तपसाधनतीव्रता;
पति जपोत तयां स्मरुनी व्रता[1]
पाणिर्यी[2] गुरु[3] ज्या[4] उपदेशिता. ५४
मना लाभतां उन्नती शिक्षणानें,
प्रपंचा पहायास लागा क्षणानें;
क्रिया आपुली पालटीं तूं क्रमानें
धना मेळवाया बऱ्या उद्यमानें. ५५
खेडयांतील खरींच सुंदर हवापाणी, मुलें, सेवुनी,
तारुण्यांत, शिकावया बहु कला, राहोत तीं जाउनी;
आबादीं[5], नगरीं[6], पुरीं[7] तशिचही त्या जुन्नरीं[8] सिन्नरीं[9],
व्हाया थोर उदार पौरें[10] म्हणुनी प्रख्यात तेथें तरी. ५६
मुंबापुरींत अथवा नगरांत राहीं,
पुण्याख्यें[11] वा इतर जानपदांत पाहीं—
त्यांच्या हितार्थ, करण्यास सुधारणा ही
त्यांच्यामध्यें, झटत जा भवध्या दिशांहीं. ५७

---

१ एकपत्नीव्रता. २ विवाहकाळीं. ३ उपाध्याय. ४ धर्मे चार्थे च कामे च नातिचरामि नातिचरामि नातिचरामि । ५ हैदराबाद ( सिंध व निजाम ), अमदाबाद, मुरादाबाद, मुर्शिदाबाद इ०. ६ अहमदनगर, भावनगर, जामनगर, श्रीनगर, इ. ७ सोलापूर, विजापूर, खैरपूर, मणिपूर, इत्यादि. ८ पुणें जिल्ह्यांत. ९ नाशिक जिल्ह्यांत. १० नागरीक ( सिटीझन ). ११ पुणें नामक.

पौरांमधें, सकल जानपदांमधें कीं
स्पर्धा दिसेल बरवी अवघ्याच लोकीं,
तेव्हांच सत्प्रगति होउनि उन्नतीतें-
पावेल देश लथडोनि अधोगतीतें. ५८

रुचिसाम्य परस्परांमधीं, असतां प्रेम न तें तुटे कधीं;
सहजींच सुसाध्यता तया, म्हणुनी ग्राह्य विवाह बाळेया[1]. ५९

जो जीवनार्थ झगडा वसतो जगांत,
ना पार ज्यास दिसतो, नच तेंवि अंत;
सामर्थ्य शारिरिक, त्यापरि मानसीक,
त्या लागतें मिळविण्यास वरांस[2] देख. ६०

तें यावया वय अवश्य वरा विसांचें,
बारा निदान गमतें वधुलाहि साचें;
देतांचि पांच पुढचीं गृहशिक्षणाला,
नारीनरांत न उणेंचि सुलक्षणाला. ६१

गांठी पडे उभयतां जरि या वयांत,
तीं साधिती रुचिगुणायुगुलास यांत;
सासू सुना तदुपरी नणंदाहि जावा,
दीर श्वशूर धरितात सम स्वभावा. ६२

'विकारहेतू असतां नजीक
त्या घालिती जे न कधींच भीक,
ते धीर[3]' हें तत्त्व ठसो मनांत
युवदंपतींच्या, अवघ्या जनांत. ६३

वधूवरें पाहुनि एकमेकां,

---

१ बालिकेशीं. २ नवऱ्या मुलास. ३ विकारहेतौ सति विक्रियन्ते । येषां न चेतांसि त एव धीराः ॥-कुमारसंभव.

वाग्निश्चयातें करिती जरी कां,
पडेल ती साखरची दुधांत,
कौतूक त्याचेंहि जनीं बुधांत. ६४
हुंडापांडा-प्रश्न मांडावयाचा
नाहीं काहीं कीस काढावयाचा;
विहिणी व्याही यांस मानापमाना-
संबंधाचा यांत नाहीं तनाना[1]. ६५
नोहेत हे बालविवाह कांहीं
दोषांस येथें स्थल लेश नाहीं,
दोहोंत मध्यस्थ, म्हणून संत-
करितील या वाटतसे पसंत. ६६
परस्पराराधनकालिं मोठे-
घडून येती व्यवहार खोटे;
त्याकारणें प्रौढविवाह रूढ-
लोकीं न होती, नच यांत गूढ. ६७
रेखाटलें चित्र मनामधें, तें
मी मांडितांहें तुमच्यापुढें, तें-
यो वा मनातें तुमच्या न यो वा,
वधूवरें भावुत यास खोवा[2]. ६८
अविभक्त कुटुंबपद्धती, मम देशा हितकारि भासती;
परि जाणुनिया परिस्थिती, उपयोगा बुध तीस आणिती. ६९
तरि तींतच फेरफार ते, करणें योग्य तयांस वाटतें;
सुचवूनि तयां करोत ते, फलदायी करण्यास शीघ्र ते. ७०
जनस्थिती जी युरपांत गाजे, कधीं न ती हिंदमहीस साजे;

१ तंटा बखेडा. २ खवा, खाऊ.

कृषिप्रिया येथिल कीं प्रजा हे, तिला तियेची रिति योग्य आहे.

कुटुंबीय जे त्यांस संतोषवायां
झिजे ज्या दिशीं आपुली अल्प काया,
असे धन्य तो दीन[1], ऐसें शिकाया--
मुलां लाविता तें न जाईल वायां. ७२

मना आवडी द्वैतभावीं नसावी
परी बुद्धि हे चित्तिं कैशी ठसावी-
मुलांच्या? कळेनाच हें कीं जनांतें,
कुटुंबीय तेणें तुटे सर्व नातें. ७३

जी 'सुप्रजानिर्मितिशास्त्र'[2]शुद्ध-
प्रजा युरोपांत लढे प्रबुद्ध,
सामर्थ्य तीचें अपुरें जयीं पडे,
संधी तयीं हिंदजनांस सांपडे. ७४

ज्यांच्यामधें बालविवाह चाले,
जन्मास त्यांच्याच कुळांत आले,
ते रज्पुतादीक तसे मराठे
रिपू-शरीरीं सलती सराटे. ७५

रणांगणीं पश्चिमपूर्वभागीं
पराक्रमा दावुनियां, अभागी-
केलें रिपूंतें, तरि ते अपात्र-
कैसे स्वराज्या? नच लेशमात्र! ७६

स्वराज्य स्थापूनी शिवनृप जनां थोर गमला
महाराष्ट्रीं जैसा, नरपति तसा जॉर्जहि मला
नव्या मोठ्या राष्ट्रीं अजि भरतभूमीस अखिला

---

१ दिवस. २ सुप्रजानिर्माणशास्त्र.

गमो भारी मोठा, बहु वितत ऐशाहि महिला. ७७
तेतीस कोटी जरि सुप्रजा ही
स्वराज्यदानें परितुष्ट राही,
तैं सर्व 'एंपायर' इंग्रजांचें
दृढत्व पावेलचि कां न साचें? ७८
ब्यूराक्रसीच्या मननार्थ हा मी-
मांडीतसें प्रश्न खराच नामीः-
साम्राज्यवादप्रिय मुत्सद्याचें
प्रश्नास या उत्तर काय साचें? ७९
'आहां तुम्ही ठाउक बोलघेवडे
सरकारचे निंदक 'ऐं[1]हरी डे''
कडें असें अम्मलदार बोलती
फडें असें उत्तर हें तयांप्रतीः— ८०
आम्हांत होते बहु जों 'मवाळ'
तैं सत्य तें; पैं फिरतांच काळ-
कर्दों[2]डके सर्वच कीं 'जहाल'
झालों कसे? तें नयनीं पहाल! ८१
जी एकोणिस नामदार मुनिं[3]नीं श्रीकालिकेच्या पुरीं[4],
किंवा 'काँग्रिस--मॉसलीम लिग' या संयुक्त एको[5]दरीं,
किंवा मद्रपुरस्थ त्यापरि महाराष्ट्रस्थ होमूरूलरी
केली मागणि जीहि गांधि[6]लिखितें, ती द्या अम्हां सत्वरीं.
मागा, ठोका, दार तें उघडाया;

१ दर दिवशीं. २. 'बोलघेवडे' याच्या उलट अर्थाचा नवा शब्द; अर्थ–कर्तबगार. ३ विचारशील जे त्यांनीं. ४ कलकत्त्यास. ५ सहोदरीं. ६ बॅरिस्टर गांधी. ७ Knock and it will open.

ऐसें बोले ख्रिस्तशास्त्री[1] मसाया.
तें ऐकोनी मागतों मागण्या या
तैसे दंडा ठोकितों त्याच न्याया. ८३
घरीं मायभाषा, जनीं देशभाषा,
जगाला असा दाखवीतों तमाशा;
बसूं ना परी व्यर्थ मारीत माशा,
स्वधर्में भजूं या जगीं त्या परेशा. ८४
शिवाशिवेतें[2] नमुनी द्विजांहीं
शिवाशिवेतें[3] न भितां, प्रजांहीं—
सदा झटावेंचि स्वराज्य घ्याया:
व्हावें शिवें सिद्धहि तेंच द्याया. ८५
मी बैसलों देउनियां[4] उंबोलें
संघाधिपा[5] पूर्वींच[6] गोड बोलें;
निधीस[7] आतां धन केंवि द्यावें?
चिंता सदा हीच मनांत भावे. ८६
जें दान द्याया नच द्यावया ये,
कैसें तया योग्य म्हणावया ये?
टीका अशी ज्येष्ठ[8] वदूनि गेले,
ते शब्द त्यांचे हृदयांत ठेले. ८७
संघाधिपा जें प्रिय कार्य वाटे,
मी लागतां त्याच सुकार्यवाटे

---

१ ख्रिस्त. २ शंकरपार्वतीस. ३ स्पर्शास्पर्शास, विटाळास. ४ अवशिष्ट आयुष्यरूप. ५ महाराष्ट्रस्वराज्यसंघाचे अध्यक्ष लो. टिळक. ६ लोकमान्यांच्या ६२ वे वाढदिवसाचे समारंभास. ७ स्वराज्यसंघाच्या द्रव्यनिधीस. ९ कवीचे ज्येष्ठ बंधु कृ. ब. गोडबोले.

मद्भक्त जैं संघहितार्थ आटे,
तैं मोद कां श्रेष्ठमनीं[1] न दाटे? ८८
'नवें भिक्षुचें गीत' बाल्यांत[2] गावें
मुलांनीं मुलींनीं, जगीं कीं तगावें;
स्वदेशीं असे जें बहू चांगलें तें
शिकाया विदेशीं दिसे जें भलें तें. ८९
'नवें भिक्षुचें गीत' ऐकूनि कानीं
दिला एक पैसा जरी बायकांनीं—
निधीतें[3], फलावाप्ति[4] त्याची सतींतें
स्वराज्याख्य लक्ष्मी मिळो तत्पतींतें. ९०
'नवें भिक्षुचें गीत' ऐकोनि कानीं
निघावें नरीं[5] जावयातें दुकानीं,
कराया खरेदी स्वदेशीय वस्तु;
म्हणा हो म्हणा संत हो! या 'तथास्तु' ९१
कृष्णातीरीं[6] जन्मली काव्यवाणी,
भागातीरीं[7] लाभली पुष्टि आणी,
तुंगाभद्रापार[8] पाहोनि खातें
गंगातीरीं[9] वास पावो सुखातें. ९२

---

१ वडील बंधूच्या मनास. २ लहानपणीं. ३ स्वराज्यसंघाच्या द्रव्यनिधीस. ४ फलप्राप्ति. ५ पुरुषांनीं. ६ कुरुंदवाड येथें. ७ पंढरपुरास, चंद्रभागेचे तिरीं. ८ दक्षिणेकडील मराठी भाषेची सीमा, तंजावर; तेथवर पसरो. ९ काशीस.

## श्रीदत्तभार्गवसंवाद.

संसारांत दुःखाचे आघात वारंवार येतात, हें सर्वांस मान्य आहे. परंतु त्याचे निवारणार्थ आत्मज्ञान करून घेणें हा जो वेदांनीं व प्राचीन तत्त्वद्रष्ट्या ऋषिजनांनीं सांगून ठेविलेला उपाय, त्यासंबंधांत पुष्कळ लोक सा-शंक आहेत. ब्रह्मज्ञान म्हणजे एक गौडबंगाल आहे; सामान्य मनुष्यास कळणारा तो विषय नव्हे; आणि अनेक जन्म त्यांत घालवावे लागतात; इत्यादि ग्रह धरून प्रयत्न सोडून देऊन पुष्कळ लोक या घरच्या स्वरूपसुखाला अंतरतात. अशांनीं **हारितायनऋषि-प्रणीत श्रीदत्तभार्गवसंवाद** सूक्ष्म विचारपूर्वक अव-श्य वाचण्याजोगा आहे. या ग्रंथानें परमार्थमार्गांतील दुर्गमता व बळेंच श्रद्धा ठेवण्याचा वेडगळ आग्रह पार नष्ट केला आहे. आणि सर्व विषय निरनिराळ्या कथा-नकांतून गोविले असल्यामुळें त्याला गोष्टीच्या पुस्तका-सारखा चटकदारपणा आला आहे. ज्ञानी पुरुषाच्या वर्तनासंबंधानें तर यांत शेवटचा निकाल दिला आहे. पृ. २४४, कागद ग्लेज, बांधणी कापडी, किं. १ रु.

**अपरोक्षानुभूति**—शंकराचार्यांचे मूळ संस्कृत स्तो-त्रावर ह्या साक्या केल्या आहेत. शिवाय सुंदर गोपीगीत व ज्ञानपर एक पद जोडलें आहे. पृ. २०; किं. ८२.

## मारुतीचा ओटा

या पुस्तकांत एका उपासकाचें आत्मवृत्त दिलें असून, निष्काम उपासनेची तीव्रता कशी असते व उपासनेनें ज्ञानभावना कसकशा जागृत होतात हें गोष्टीच्या रूपानें दाखविलें आहे. पृ. २४; किं. १॥ आणा.

**नवपुष्पमाला**-यांत श्रीरामचरित्ररहस्य, भिक्षुगीत, त्रिगुणातीत, स्फुट पदें इत्यादि लहान मोठीं १० प्रकरणें असून कविता अगदीं सुबोध आहे. पृ. ३४; किं. ८२

**अमृतानुभव**—ज्ञानेश्वरांच्या अमृतानुभवावर यांत ओवीगणित साकी केली असून त्यायोगें जुन्या प्राकृत भाषेंतील कठिण शब्दांची मूळ काव्यांतील अडचण पूर्णपणें दूर झाली आहे. पृ. ९६; किंमत ४ आणे.

**संमोहनिरास**—देवानें हें जग उत्पन्न कां केलें? व त्यांत दुःख कां असावें? इत्यादि संमोहांवर वेदान्तशास्त्राचें उत्तर ४३ श्लोकांत यांत दिलें आहे. किं. ८॥

**गोपीगीत**—किंमत पाव आणा.

सर्व पुस्तकें एकदम घेणारास किं. १॥ रुपया.

प्रत्येक पुस्तकास ट. ख. निराळा.

ण भाऊ जोशी;

वंत प्रेस, पुणें शहर.

REFBK-0001469
REFBK-0001469